आर्थिक वर्षाच्या अखेरीस खरेदीच्या प्रस्तावांबाबत करावयाची कार्यवाही

**डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला**
**अर्थ प्रशासन विभाग**
**पी.ओ. कृषि नगर, अकोला -४४४ १०४ (महाराष्ट्र)**

जा.क्र.अप्रवि/वर्षा.अखेर.खरेदी/2437/२०२६ दिनांकः 03/०२/२०२६

**वाचा :** शासन परिपत्रक वित्त विभाग क्र. संकीण-२०२५/प्र.क्र.९३/कोषा-प्रशा५, दि.०३ फेब्रुवारी, २०२६.

# परिपत्रक

विद्यापीठातील सर्व नियंत्रण अधिकारी/ विभागप्रमुख / कार्यालय प्रमुख/ आहरण व संवितरण अधिकारी यांना सुचित करण्यात येते की, चालू आर्थिक वर्ष **२०२५-२६** या वर्षाच्या अखेरीस खरेदीच्या प्रस्तावाबाबत करावयाच्या कार्यवाहीचे संदर्भीय शासन परिपत्रक काढण्यात आलेले आहे.

त्या अनुषंगाने विद्यापीठातील सर्व नियंत्रण अधिकारी/ विभागप्रमुख / कार्यालय प्रमुख/ आहरण व संवितरण अधिकारी यांनी सदर शासन परिपत्रकाचे काटेकोरपणे पालन करुन त्यानुसार चालू वर्ष सन **२०२५-२६** मध्ये खरेदी विषयक कार्यवाही करण्यात यावी.

नियंत्रक
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला

**सोबत :** संदर्भीय शासन परिपत्रक.

**प्रत :** १) सर्व आहरण व संवितरण अधिकारी, डॉ.पं दे.कृ.वि., अकोला यांना कार्यवाहीस्तव
२) कुलसचिव, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला यांना माहितीस्तव.
३) वेतन व लेखाधिकारी, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला / नागपूर.
४) कुलगुरु यांचे स्वीय सहायक, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांना मा.कुलगुरु यांच्या माहितीकरीता.
५) प्रभारी अधिकारी, संगणक प्रणाली कक्ष,डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला यांना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसारणाकरीता.

**आर्थिक वर्षाच्या अखेरीस खरेदीच्या प्रस्तावांबाबत करावयाची कार्यवाही**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण-२०२५/प्र.क्र.९३/कोषा. प्रशा-५**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०३ फेब्रुवारी, २०२६

**संदर्भ** : शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण-२०२४/प्र.क्र.१०१/२४/कोषा. प्रशा-५, दिनांक १७.०१.२०२५.

## शासन परिपत्रक :

अर्थसंकल्पीय वितरण प्रणाली सुरू करताना विभागांनी रोख प्रवाह (Cash Flow) लक्षात घेऊन त्यांना उपलब्ध असलेल्या निधीचे नियोजन करूनच खर्च करणे अपेक्षित आहे. तथापि, काही विभागांकडून आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तीन महिन्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर खर्च होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे.

२. सदर बाबी विचारात घेऊन, अनावश्यक अथवा प्राधान्यक्रम नसलेल्या बाबींवरील खर्च नियंत्रित व नियमित करण्याच्या उद्देशाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे:-

१) सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षात दि. १५ फेब्रुवारी, २०२६ व त्यानंतर सर्व प्रशासकीय विभागांनी व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांनी कोणत्याही खरेदीच्या प्रस्तावांना मंजुरी देऊ नये. तसेच, फर्निचरची दुरुस्ती, झेरॉक्स मशिन, संगणक, उपकरणे अथवा त्यांचे सुटे भाग यांची दुरुस्ती, नैमित्तिक कार्यशाळा, सेमिनार, भाड्याने कार्यालय घेणे इत्यादी बाबींशी संबंधित प्रस्तावांना मंजुरी देण्यात येऊ नये व असे प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर करू नयेत.

२) उपलब्ध निधीच्या मर्यादेत औषधे खरेदीची बाब यास अपवाद राहील. तसेच, केंद्र पुरस्कृत योजना व त्याअंतर्गत राज्य हिस्सा तसेच बाह्य सहाय्यित प्रकल्पांतर्गत खरेदीच्या प्रस्तावांना देखील सदर निर्बंध लागू होणार नाहीत.

३) जिल्हा वार्षिक योजना तसेच लोकप्रतिनिधी यांच्या स्थानिक विकास निधीतून खरेदीसंबंधीचे प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर करता येतील. त्यावर प्रकरणपरत्वे निर्णय घेण्याचे अधिकार वित्त विभागाकडे राहतील

४) दि. १५ फेब्रुवारी, २०२६ व त्यानंतर कोणत्याही खरेदीच्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देण्यात येणार नाही अथवा प्रशासकीय मान्यता प्राप्त असेल तरी निविदा प्रसिद्ध करता येणार नाहीत. मात्र, दि. १५ फेब्रुवारी, २०२६ पूर्वी निविदा प्रसिद्ध झालेल्या प्रकरणी खरेदीची पुढील सर्व प्रक्रिया पूर्ण करता येईल.

५) चालू आर्थिक वर्षात कार्यालयाच्या दैनंदिन वापरातील उपभोग्य वस्तूंच्या मर्यादित खरेदीसाठी सदर निर्बंध लागू राहणार नाहीत. तथापि, पुढील वर्षात आवश्यक असणाऱ्या वस्तूंची आगाऊ खरेदी करता येणार नाही.

३. वरील आदेश चालू आर्थिक वर्षाकरिता असून **दि. १५ फेब्रुवारी, २०२६ ते दि. ३१ मार्च, २०२६** या कालावधीसाठी लागू राहतील.

४. सदर आदेश सर्व प्रशासकीय विभाग, त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व कार्यालये, शासकीय महामंडळे, अनुदानित संस्था तसेच स्थानिक स्वराज्य संस्था (नागरी / ग्रामीण) इत्यादींबाबत शासनाने उपलब्ध करून दिलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीमधून करावयाच्या खरेदीकरीता लागू राहतील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०२०३१६१५१०५५०५ असा आहे. हे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by RAVIKUMAR BALAJIRAO LINGANWAD
Date: 2026.02.03 16:16:34 +05'30'

**(रविकुमार लिंगनवाड)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री तथा मा.मंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव
३. मा.उप मुख्यमंत्री (नगर विकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम विभाग (सार्वजनिक उपक्रम)) यांचे प्रधान सचिव
४. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण , अल्पसंख्यांक विकास व औकाफ.) यांचे सचिव
५. सर्व मा. मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
६. मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई
७. सर्व सन्माननीय विधान सभा / विधान परिषद व संसद सदस्य
८. अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग

९. सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांच्या अधिनस्त असलेले सर्व विभाग प्रमुख, प्रादेशिक कार्यालय प्रमुख व कार्यालय प्रमुख
१०. प्रबंधक, मूळ शाखा, उच्च न्यायालय, मुंबई
११. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा) १, महाराष्ट्र, मुंबई
१२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई
१३. महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर
१४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२. महाराष्ट्र, नागपूर
१५. आयुक्त, आयकर (TDS) चर्नीरोड, मुंबई ४००००२
१६. आयुक्त, आयकर (TDS) सिव्हील लाईन, नागपूर ४४४००१
१७. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा) मुंबई
१८. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
१९. सचिव, महाराष्ट्र विधीमंडळ सचिवालय, मुंबई
२०. प्रबंधक, लोक आयुक्त व उपलोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
२१. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई
२२. मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२३. विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली
२४. सर्व विभागीय आयुक्त
२५. सर्व जिल्हाधिकारी
२६. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२७. संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२९. प्रादेशिक सह संचालक, लेखा व कोषागारे, कोकण/ पुणे /नाशिक/छत्रपती संभाजीनगर / अमरावती / नागपूर
३०. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
३१. प्रादेशिक सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा कोकण/ पुणे/नाशिक /छत्रपती संभाजीनगर / अमरावती / नागपूर
३२. वरिष्ठ जिल्हा कोषागार अधिकारी, ठाणे /पुणे /नाशिक/छत्रपती संभाजी नगर / अमरावती / नागपूर
३३. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
३४. वित्त विभागातील सर्व कार्यासने
३५. निवड नस्ती कोषा प्रशा-५